

हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

Hello Prabhat Media

Print - Electronic - Social

■ संपादक : गणेश पाटील ■

■ मुंबई ■ पुणे ■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सोलापुर ■ अहिल्यानगर

सांगली-कोल्हापूर ■ वर्ष : ०६ ■ अंक : ३१७ ■ शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४


# राष्ट्रवादीत फूट...सब झूट?

## शिंदेसेनेला संभ्रमात टाकण्याचा चतुर डाव

सांगली : हॅलो प्रभात

**जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी रणसंग्राम सुरू आहे या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजितदादा गटात पाठिंबा महायुतीला द्यायचा की महाविकास आघाडीला द्यायचा यावरून फूट पडण्याच्या बातम्या हेतू पुरस्सर प्रसिद्ध केल्या जात आहेत. मार्चच्या पहिल्या आठवड्यात किंवा दुसऱ्या आठवड्यात जिल्हा परिषदेची अध्यक्षपदाची निवड होण्याची शक्यता आहे . त्या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेला संभ्रमात टाकण्याची ही चतुर खेळ आहे, असे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे.**

मोठ्या आत्मविश्वासाने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उतरलेल्या भारतीय जनता पक्षाचे पानिपत झाले. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजितदादा गटाने सहा आणि शिंदे सेनेने सात जागावर विजय मिळवला. २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणूकीत शिवसेनेला केवळ तीन जागांवर समाधान मानावे लागले होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या चार जागा शिंदे सेनेला अधिक मिळाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला असून सांगली जिल्ह्यात शिंदे सेनेची ताकद वाढू लागली आहे,असे शिवसैनिकांमध्ये बोलले जात आहे. शिंदेसेनेपेक्षा कमी जागांवर विजयी झालेला राष्ट्रवादीचा पक्ष जास्त उड्या मारू लागल आहे. एक टर्मचे अध्यक्षप देतो म्हटल्यावर देखील राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये समाधान नाही आणि महायुतीला पाठिंबा देण्याच्या प्रश्नावर राष्ट्रवादीमध्ये फूट पडत असल्याच्या बातम्या येत आहेत, ही चतुर खेळी आहे. असे राजकीय निरीक्षकांचे स्पष्ट मत आहे. शिंदेसेना पूर्वीच्या शिवसेनेच्या तुलनेत अधिक ताकदीने सांगली जिल्ह्यात वाढत आहे. भाजपबरोबर महायुतीत राहणे अधिक फायदेशीर आहे हे शिंदे सेनेच्या नेत्यांनी ओळखले असल्यामुळे त्यांच्यात संभ्रम निर्माण करण्यासाठी राष्ट्रवादीकडून खेळ्या केल्या जात आहेत. महायुतीबरोबर राहून आणि सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस, महाविकास आघाडीकडे गेली तर सत्तेपासून आपण दूर जाऊ ही भीती शिंदे सेनेच्या मनात ठसविण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. तथापि शिंदे सेनेने तटस्थ राहत प्राप्त परिस्थितीवर नजर ठेवल्यामुळेच विरोधी महाविकास आघाडीतील हालचाली वाढल्या आहेत त्यामुळे कधीकाळी दुष्काळी फोरमचे नेते म्हणून मिरवणाऱ्या आणि सध्या राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटात असलेल्या नेत्यांना हाताशी धरून डावपेच केले जात आहेत. सांगली जिल्हा परिषदेचा विचार करून राष्ट्रवादीचे प्रांतीय नेते आत्मघातकी निर्णय घेणार नाहीत. अजितराव घोरपडे यांनी प्रांतिय नेत्यांनी निर्णय घेण्याचे अधिकार दिले असल्याचे सांगितले असले तरी त्यावर विश्वास बसणे शक्य नाही. राज्यात महायुतीच्या सत्तेत अजितदादांची राष्ट्रवादी महत्त्वाचा घटक पक्ष आहे अशा स्थितीत महाविकास आघाडीला सांगली जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिला तर त्याचे परिणाम राज्यातील महायुतीवर होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत राष्ट्रवादीजवळ अजितदादांच्या तोडीचा सर्वसमावेशक नेतृत्व असलेला नेता नाही त्यामुळेच प्रांतीय नेते सावधपणे पावले टाकतील.




महाविकास आघाडीकडून सध्या दुष्काळी फोरमच्या नेत्यांना पुढे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महाविकास आघाडीची सत्ता येऊ शकते म्हटल्यानंतर शिंदे सेना महायुतीतच राहणे शक्य नाही हे ओळखूनच शिंदे सेनेला संभ्रमात टाकण्याची खेळी केली जात असल्याचे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे.

अजितदादांची राष्ट्रवादी ही मूळ राष्ट्रवादीतून फुटून बाहेर आलेली राष्ट्रवादी आहे शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि अजितदादांची राष्ट्रवादी यांचा मतदार एकच आहे, उलट अल्पसंख्यांक समाजातील अनेकांना महत्त्वाच्या पदांवर बसवून अल्पसंख्यांकांच्या मतांमध्ये घुसखोरी करण्याचा अजितदादा राष्ट्रवादीचा डाव यशस्वीही झाला आहे. सांगली जिल्ह्यातील राष्ट्रवादी अजितदादा गट हा भाजपला नव्हे तर राष्ट्रवादी शरद पक्ष पवार पक्षाला आव्हान आहे. हा पक्ष वाढला तर त्याचा सर्वाधिक फटका राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला बसणार आहे. त्या दृष्टिकोनातून शरद पवार यांनी जसे भाजपपासून तत्कालीन शिवसेनेला बाजूला केले, त्याचप्रमाणे भाजप पासून राष्ट्रवादी अजितदादा गटाला बाजूला करण्याची खेळी खेळली जात आहे. अजितदादा राष्ट्रवादी महायुती बरोबर राहणे त्यांच्या दृष्टिकोनातून फायद्याचे आहे, परंतु धृतराष्ट्रासारखे काही नेते सांगली जिल्ह्यात या पक्षात असल्यामुळे आणि शकुनी मामा सारखे अनेकजण ठिय्या मारून असल्यामुळेच सध्याचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा विचित्र परिस्थितीतून चमत्कारिक राजकारण होण्याची आणि जिल्ह्याच्या राजकारणात मोठा भूकंप येण्याची शक्यता देखील राजकीय जानकारांतून व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त...

### जिल्ह्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन

सांगली : हॅलो प्रभात

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात विविध ठिकाणी प्लेसमेंट ड्राईव्ह / रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त इनुजा शेख यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

### एचआयव्ही संसर्गितांसाठी वधू-वर मेळावा

सांगली : हॅलो प्रभात

एचआयव्हीची लागण झालेल्या आणि नियमित ए.आर.टी. उपचार घेत असलेल्या विवाह इच्छुक व्यक्तींना योग्य जीवनसाथी मिळावा, त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने आयुष्य जगता यावे या उद्देशाने एच.आय.व्ही. संसर्गित व्यक्तींसाठी १ मार्च २०२६ रोजी सांगली येथील मराठा सेवा संघ हॉलमध्ये वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. विवाह इच्छुक युवक-युवतींनी या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केले आहे.

### भाजप जनसंपर्क कार्यालयात शिव जयंती उत्साहात

सांगली : हॅलो प्रभात

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आ.सुधीरदादा गाडगीळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात भारतीय जनता पक्षाच्या वतीने अभिवादन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.

### छ.शिवाजी महाराजांची तत्वे आचरणात आणावीत

सांगली : हॅलो प्रभात

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासावर अनेक कथा-कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत, परंतु केवळ इतिहास वाचून न थांबता, महाराजांची तत्त्वे आणि मूल्ये जर आपण आपल्या वैयक्तिक आयुष्यात आचरणात आणाव, तर आपल्या आयुष्याचे नक्कीच सोने होईल. आजच्या शिवजयंतीनिमित्त हीच महाराजांना खरी आदरांजली ठरेल," असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी केले.

## 'सोनहिरा'कारखान्याच्या गाळप हंगामाची सांगता



वांगी : हॅलो प्रभात

डॉ.पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या गळीत हंगामाची सांगता झाली. गाळप हंगाम सभासद, शेतकरी,तोडणी वाहतूक कंत्राटदार,कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे यशस्वीपने पार पडला असल्याचे मत कारखान्याचे चेअरमन आमदार मोहनराव कदम दादा यांनी व्यक्त केले. ते कारखाना गाळप हंगाम सांगता समारंभाप्रसंगी पोती पूजन प्रसंगी बोलत होते.चालू गळीत हंगामात ११० दिवस उसाचे गाळप झाले. त्यामध्ये ९,७३,००० मे.टन गाळप झाले.यावेळी तोडणी वाहतूक कंत्राटदार, बैलगाडी कंत्राटदार, हार्वेस्टिंग मशिन मालक यांचा कारखान्याचे वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन दिलीपराव सूर्यवंशी, संचालक पी.सी.जाधव, पंढरीनाथ घाडगे, बापुसो पाटील, युवराज कदम, सयाजी धनवडे, जगन्नाथ माळी, शिवाजी गढळे, संभाजी जगताप, शिवाजी काळेबाग, कार्यकारी संचालक एस.एफ.कदम, सभासद, सर्व खातेप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

## कामांचे प्रस्ताव पाठवा, वनमंत्र्यांशी चर्चा करू : आ.जयंतराव पाटील

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी उरुण ईश्वरपूर येथील दत्त टेकडी परिसराला भेट देऊन येथील सोई-सुविधांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी उर्वरित विकास कामांचे प्रस्ताव करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन आपण या कामांच्या मंजुरीबद्दल राज्याच्या वनमंत्र्यांशी चर्चा करू, अशी ग्वाही दिली.



### दत्त टेकडी परिसराची पहाणी ; घेतला कामांचा आढावा

याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता स्वप्नील पाटील,कुंडलिक पाटील,उपवनसंरक्षक सागर गवते,शिराळा- वाळवा वनक्षेत्रपाल रमेश कांबळे,नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे,उपनगराध्यक्ष खंडेराव जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.आ.जयंतराव पाटील म्हणाले,या परिसरात खुल्या व्यायाम शाळेसाठी जागा निश्चित करावी,ही व्यवस्था करता येईल. येथे राजारामबापू सहकारी बँकेच्या माध्यमातून बस थांबा स्थानक उभारण्यात येईल. उरुण ईश्वरपूर नगरपालिकेने तशी राजारामबापू सहकारी बँकेकडे मागणी करावी. सटवाई मंदीर परिसराची सुधारणा करून येथे महिलांची बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी. दत्त टेकडी परिसरात येण्याच्या वेळा निश्चित करून गरजेप्रमाणे सूचना देण्यासाठी ध्वनी क्षेपकाची व्यवस्था करावी. या परिसरात उत्पन्नाचे स्रोत काय उभा करता येतील? याचाही विचार व्हावा. उपअभियंता स्वप्नील पाटील, उप वन संरक्षक सागर गवते यांनी आ.जयंतराव पाटील यांना दत्त टेकडी परिसरातील विविध कामांची व उर्वरित कामांची सविस्तर माहिती दिली. आ.पाटील यांनी अधिकाऱ्यांशी विविध मुद्द्यावर सविस्तर चर्चा करून सूचना केल्या.याप्रसंगी अँड.धैर्यशील पाटील,नगरसेवक सुनिल मलगुंडे,नगरसेवक स्वरूप मोरे,सभापती संदीप माने,नगरसेवक संग्राम पाटील,प्रवीण पाटील,सुहास पाटील,तसेच संबंधित अधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



## माधवी ढेकळे यांना कला अकादमीचा पुरस्कार

देवराष्ट्रे : संदेश जाधव

न्यू सेकंडरी स्कूलमधील सहशिक्षिका सौ.माधवी ढेकळे यांनी वर्षभर सातत्याने अष्टाक्षरी, मुक्त छंद या काव्य प्रकारात कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण केले आहे. सौ.माधवी ढेकळे (रा.हिंगणगाव बुद्रुक) यांनी मागील वर्षभर अक्षरमंच काव्य लेखन स्पर्धेत सादर केलेल्या कवितांना उत्कृष्ट, सर्वोत्कृष्ट असे नामांकन मिळाले आहेत.

कवितेतील त्यांच्या योगदानाबद्दल कार्यक्रमाला उपस्थित असलेले डॉ. मधुसूदन घाणेकर, शिवाजी खैरे- संस्थापक व अध्यक्ष- अष्टपैलू संस्कृती कला अकादमी, सौ.अनुसया खैरे यांच्या हस्ते आळंदी, पुणे येथे राज्यस्तरीय काव्य लेखन पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

त्यांच्या या यशाबद्दल भारती विद्यापीठ शालेय समितीच्या अध्यक्षा विजयमाला कदम, आ.डॉ. विश्वजित कदम, मुख्याध्यापक बी.जे.म्हस्के यांनी अभिनंदन केले आहे.

## महापौर-उपमहापौरसह विरोधीपक्षनेत्यांचा सत्कार

सांगली : हॅलो प्रभात



सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिकेचे नूतन महापौर धीरज सूर्यवंशी, उपमहापौर गजानन मगदूम तसेच विरोधीपक्ष नेते मंगेश चव्हाण यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी तीनही शहरांतील प्रमुख व्यापारी संघटनांनी संयुक्त भेट दिली.

यावेळी मिरज व्यापारी असोसिएशनचे विराज कोकणे, कुपवाड व्यापारी संघटनेचे अमर दिडवळ व बिरु आसकी, व्यापारी एकता असोसिएशनचे समीर शहा, ज्येष्ठ व्यापारी तात्या गडदे यांच्यासह विविध संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

महापौर धीरज सूर्यवंशी व उपमहापौर गजानन मगदूम यांनी लवकरच सर्व अधिकारी व व्यापारी संघटनांची संयुक्त बैठक घेऊन प्रलंबित मागण्या व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. विरोधीपक्ष नेते मंगेश चव्हाण यांनीही व्यापाऱ्यांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

व्यापारी संघटनांनी प्रशासन व व्यापारी प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्याची मागणी करत, आयुक्तांच्या कारवाईदरम्यान लोकप्रतिनिधींचा सहभाग असावा, जेणेकरून अन्यायकारक कारवाई टाळता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.तीनही शहरांतील प्रमुख संघटनांचे संचालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'शोएब घोडीमार'ला 'मोस्ट इम्पॅक्टफुल प्रोजेक्ट अवॉर्ड'

### डी.वाय.पी.कॅम्पसच्या शैक्षणिक कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

तळसंदे : हॅलो प्रभात

व्हिएतनाम येथे झालेल्या सातव्या आशिया युवा शिखर परिषदेत डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसच्या शोएब घोडीमारला 'मोस्ट इम्पॅक्टफुल प्रोजेक्ट अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात आले. व्हिएतनामच्या हो ची मिन्ह सिटीमध्ये १ ते ४ फेब्रुवारी दरम्यान 'कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे जागतिक परिवर्तन : तंत्रज्ञान, शिक्षण आणि व्यक्ती यांची सांगड' या विषयावर सातवी आशिया युवा शिखर परिषद उत्साहात पार पडली. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भारतातून केवळ तीन प्रतिनिधींची निवड करण्यात आली होती आणि त्यामध्ये शोएब घोडीमार याचा समावेश होता.आशिया खंडातील विविध देशांतील युवा प्रतिनिधी, विद्यार्थी, संशोधक, उद्योजक आणि शैक्षणिक तज्ज्ञांच्या उपस्थितीत ही परिषद संपन्न झाली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने शिक्षण, उद्योग, आरोग्यसेवा, तंत्रज्ञान आणि सामाजिक विकास



क्षेत्रात जागतिक स्तरावर परिवर्तन कसे घडवून आणता येईल, यावर सखोल व्याख्याने, परिसंवाद, कार्यशाळा आणि सादरीकरणे घेण्यात आली. आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी युवकांना नवकल्पना, नेतृत्वगुण, जागतिक सहकार्य आणि शाश्वत विकास याबाबत मार्गदर्शन केले. या परिषदेत शोएब घोडीमार याने 'ह्युम्यानिटी सेंटर्ड ए आय' हा प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाची प्रभावी मांडणी आणि सामाजिक उपयुक्तता याची दखल घेऊन 'मोस्ट इम्पॅक्टफुल प्रोजेक्ट अवॉर्ड'प्रदान करण्यात आला. या उल्लेखनीय यशामुळे डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसच्या शैक्षणिक कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे. या परिषदेकरिता संस्थेमार्फत त्यांना अंशतः आर्थिक सहाय्य देण्यात आले होते. टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. एस. आर. पावसकर, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. उमेश पाटील आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. शोएब तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले.




## वाढती शहरे ; काँक्रीटचा सापळा?

प्रत्येक पावसाळ्यात मुंबईत एकच चित्र दिसते, झाड कोसळते, वाहनांचे नुकसान होते, जीवितहानीची भीती निर्माण होते आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा विकासाच्या गजरात सर्व काही विसरले जाते. उड्डाणपूल, मेट्रो, किनारी रस्ते, बोगदे,या सगळ्यांच्या नकाशात झाडे अनेकदा 'अडथळा' म्हणून दाखवली जातात. पण आपण एक मूलभूत प्रश्न विचारत नाही: शहराचा श्वास कापून आपण शहराला खरोखरच विकसित करतो आहोत का?

भारत २०४७ पर्यंत अर्ध्याहून अधिक लोकसंख्या शहरांत राहील अशा टप्प्याकडे वेगाने जात आहे. मुंबई, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, दिल्ली यांसारखी शहरे वेगाने विस्तारत आहेत. मात्र या विस्ताराची किंमत पर्यावरणीय हिशेबात मोजली जात नाही. प्रकल्पांच्या अंदाजपत्रकात सिमेंट, स्टील, यंत्रसामग्रीची नोंद असते; पण हरवलेल्या झाडांची, वाढलेल्या तापमानाची, बिघडलेल्या जलचक्राची किंमत कुठेच दिसत नाही.

### केवळ छाटणी नव्हे, शहरी सुरक्षेचे शास्त्र

'आर्बोरिकल्चर' हा शब्द अजूनही अनेकांसाठी अनोळखी आहे. प्रत्यक्षात हे शहरी झाडांचे वैज्ञानिक व्यवस्थापन करणारे शास्त्र आहेड्डसंरचनात्मक जोखीम मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे संरक्षण, बांधकामाचा परिणाम अभ्यास, कायदेशीर चौकट, जैवविविधतेचे जतन यांचा यात समावेश होतो.

एक प्रौढ झाड कार्बन शोषते, बाष्पोत्सर्जनाने तापमान २ ते ४ अंशांनी कमी करते, पावसाचे पाणी जमिनीत मुरवते, ध्वनिप्रदूषण घटवते आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते. म्हणजे झाडे 'सजावट' नाहीत; ती शहरी पायाभूत सुविधेचा अविभाज्य भाग आहेत.

### मुंबईची कसोटी

मुंबईसारख्या शहरात आव्हान अधिक तीव्र आहे. जुन्या वटवृक्षांची छाया, खारफुटीची जंगले, जैवविविधतेचा वारसाड्डआणि दुसरीकडे प्रचंड बांधकाम दडपण. गेल्या दशकात मेट्रो, किनारी रस्ता व महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे बाधित झाली. काही तोड अपरिहार्य होती; परंतु अनेक ठिकाणी पर्यायांचा गंभीर विचार झाला का? प्रशिक्षित आर्बोरिस्ट निर्णय प्रक्रियेत सहभागी होते का? झाडे कोसळण्याच्या घटना 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून सोडवता येत नाहीत. चुकीची छाटणी, मुळांवरील दबाव, बांधकामातील अयोग्य नियोजनयामुळे झाडे कमकुवत होतात. प्रमाणित जोखीम मूल्यांकन ही केवळ खर्चाची बाब नाही; ती सार्वजनिक सुरक्षेची हमी आहे.चेन्नईतील शाळेच्या बांधकामावेळी शंभर वर्षांचा वटवृक्ष वाचवण्यात आलाड्डसविस्तर मूल्यांकन, मुळांचा आराखडा, संरचनात्मक तपासणी यांच्या आधारे. दुसरीकडे, मुंबईजवळील डेटा सेंटर प्रकल्पासाठी ९०० हून अधिक झाडांचे प्रभाव मूल्यांकन करण्यात आले. म्हणजे विकास आणि संवर्धन हे परस्परविरोधी नाहीत; योग्य नियोजनाने दोन्ही शक्य आहे.

जागतिक स्तरावर यूके, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, अमेरिका येथे आर्बोरिकल्चर प्रगत टप्प्यावर आहे. भारताला नव्याने चाक शोधण्याची गरज नाही अनुभव स्वीकारण्याची गरज आहे.

### आंतरराष्ट्रीय संवाद, स्थानिक कृती

मुंबईत ६ ते ८ मार्च २०२६ दरम्यान आंतरराष्ट्रीय आर्बोरिकल्चर परिषद आयोजित होत आहे. ६ मार्च रोजी खएड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, वांद्रे येथे आणि महाराष्ट्र निसर्ग उद्यान, धारावी येथे पूर्व-परिषद कार्यशाळा होणार आहेत. ७-८ मार्चला सहारा स्टार, विलेपार्ले (पूर्व) येथे मुख्य परिषद पार पडेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वाढती शहरे, हिरवे छत्र या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. देश-विदेशातील तज्ज्ञांचा सहभाग ही सकारात्मक पायरी आहे.

### श्वास घेणाऱ्या शहरांची गरज

आज प्रश्न विकासाचा नाही; विकासाच्या गुणवत्तेचा आहे. उंच इमारती आणि रुंद रस्ते ही प्रगतीची एकच बाजू आहे. दुसरी बाजू म्हणजे सावली, स्वच्छ हवा, पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन आणि सुरक्षित हरित संरचना. आर्बोरिकल्चरला शहरी नियोजनाच्या मुख्य प्रवाहात स्थान दिल्याशिवाय भविष्यातील शहरे राहण्यायोग्य ठरणार नाहीत. काँक्रीटच्या जंजाळात अडकलेली नव्हे, तर श्वास घेणारी, संतुलित आणि सुरक्षित शहरे उभारणे हीच खरी 'विकासाची' व्याख्या ठरली पाहिजे.

# लोकांना एकमेकांशी जोडणारे साधन : मातृभाषा

**हॅलो प्रभात**

दरवर्षी संपूर्ण जगभर २१ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन (International Mother Language Day) म्हणून साजरा केला जाणारा दिवस आहे. हा दिवस भाषिक आणि सांस्कृतिक विविधता आणि बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच वैयक्तिक व सामुदायिक विकासासाठी मातृभाषेच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी समर्पित आहे.

आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाला टंग डे (Tongue Day), मदर लँग्वेज डे (Mother language Day), मदर टंग डे (Mother Tongue Day), लँग्वेज मूव्हमेंट डे (Language Movement Day) आणि Shohid Dibosh या नावाने देखील ओळखले जाते. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वापराने जगभरातील अनेक मातृभाषा लोप पावत चालल्याचे चित्र आहे. मात्र असे होऊ नये यासाठी युनेस्कोने पुढाकार घेत मातृभाषा आणि त्यासोबत संबंधित संस्कृती टिकावी यासाठी आजच्या २१ फेब्रुवारी या दिवसाची निवड केली आहे. आजच्या सर्व मुलांना व्हॅलेंटाइन डे माहिती आहे. परंतु बहुतांश मुलांना मराठी भाषा दिनाची माहिती नसते ही वस्तुस्थिती आहे. मातृभाषा टिकवण्यासाठी जनजागृती आवश्यक असून त्याची खरी सुरुवात ही कुटुंबातूनच होणे अत्यावश्यक आहे. जागतिकीकरण ही वस्तुस्थिती असून ते स्वीकारलेच पाहिजे. कारण त्यामुळे आर्थिक विकास झाल्याचे नाकारता येणार नाही. आता जागतिकीकरण खेड्यांपर्यंत पोहोचलेले आहे. जागतिकीकरणात मातृभाषा टिकवण्याचे मोठे आव्हान असून, मातृभाषेला धोका घरातूनच असल्याने मातृभाषा जतनाची सुरुवात कुटुंबातूनच होण्याची गरज आहे. जागतिकीकरणाच्या जमान्यात मातृभाषेसह आणखी एक भाषा येणे गरजेचे बनले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३८ टक्के विद्यार्थ्यांचे कम्युनिकेशन स्कील पूअर असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. बॅलन्स साधता आला पाहिजे. अमेरिकेतील १५५ शाळांमध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार दोन भाषा येत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अधिक प्रगती असल्याचे दिसून आले आहे.

प्रत्येकाला आपापली मातृभाषा म्हणजे काय हे माहीतच असते. पण सध्याच्या प्रगत तंत्रज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आपण आपण अनेक भाषा बोलतो आणि शिकतो. परंतु आपल्या मनावर पकड असते ती मात्र आपल्या मातृभाषेची.

मातृभाषेला मान देणे म्हणजे काय? तसेच आजच्या प्रगत आणि बदलत्या काळात एक जीव दोन नवीन भाषा येणे हे किती महत्त्वाचे आहे त्याचा तुम्हाला तुमच्या भविष्यात नोकरी मिळवण्यासाठी कसा उपयोग होऊ शकतो हे सांगू शकते. जर आपण दाक्षिणात्य राज्यात गेला असाल तर तिथे फक्त एकच भाषा बोलली जाते जी त्या राज्याची राजभाषा असते. जर आपण परराज्यातून याल तर ती भाषा अवगत केल्याशिवाय गत्यंतर नसते. भाषेचा स्वाभिमान कसा जपावा हे यांच्याकडून आपण शिकले पाहिजे.

याउलट आपल्या महाराष्ट्र राज्यात मराठीसाठी इतकी तत्परता दाखवली जात नाही. तर सर्रास हिंदी भाषेचा वापर केला जातो. खाजगी क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये दोन मराठी माणसे देखील एकमेकांशी हिंदीमध्ये संवाद करतात. का? मराठी बोलायची लाज वाटते? व्वा रे सो कॉल्ड एज्युकेटेड पीपल. आपल्यालाच आपली मातृभाषा बोलायला का लाज वाटते? आपल्याला कधी आपल्या आईची लाज वाटते का? नाही ना? मग आपण आपल्या मातृभाषेला का हिन लेखतो? जर आपणच तिचा उचित सन्मान नाही केला तर बाकीच्या लोकांकडून अपेक्षा करण हे चुकीचं आहे. नुसते २१ फेब्रुवारीला आजण २७ फेब्रुवारीला एक दिवासापुरत भाषेविषयी प्रेम दाखवून किंवा रॅली काढून, स्पर्धा ठेवून आणि व्हॉट्सपवर स्टेटस ठेवून चालणार नाही. त्याकरता मनातून आपल्या मातृभाषेचा अभिमान वाटायला हवा. जर का आपण आपल्या मातृभाषेला आदर दिला, तिला सन्मान दिला तर आपले स्टेटस हे नक्कीच उंचावेल. मग आपल्याला आपल्या मातृभाषेच्या करता कोणाची लाचारी करायला लागणार नाही. प्रत्येक भाषेविषयी आपल्या मनात आदर हवाच. प्रत्येक भाषेचा दर्जा हा वेगळा आहे.

भाषा ही एकमेकांना जोडण्याचे काम करते आणि मातृभाषा ही आपल्या माणसांना एकत्र आणते. भाषा हा सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आपली भाषा आपल्या संस्कृतीची ओळख असते. भाषेत स्वतःचाच एक गोडवा असतो. तो गोडवा आपल्याला जगता आला पाहिजे. शालेय शिक्षणातही मराठी भाषा नाही. मराठी शाळा बंद होत चालल्या आहेत. इंग्रजी माध्यमाचा वाढता प्रभाव पाहता मराठी ज्ञानभाषा होणार असे म्हणता येणार नाही. शालेय शिक्षणात मराठीचा वापर वाढला तरच पुढची पिढी मराठी बोलू शकेल नाही तर मराठीचा विसर पडेल आणि ज्ञानभाषा तर सोडाच बोली भाषेसाठीदेखील मराठी उरणार नाही. म्हणून आजच्या दिवसापासून आपण हा नियम करूयात की आपण निदान महाराष्ट्रात तरी परप्रांतीय लोकांशी सुद्धा आपल्या मातृभाषेतूनच बोलुयात आणि आपल्या मातृभाषेला तिचा उचित दर्जा मिळवून देऊया. मातृभाषेचा सन्मान करूया आणि मातृभाषा जतनसुद्धा करूया.




**२१ फेब्रुवारी : आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन**

## का साजरा केला जातो 'जागतिक मातृभाषा दिन'

आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुभाषावादाला प्रोत्साहन देण्यासाठी, भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेला चालना देण्यासाठी दरवर्षी २१ फेब्रुवारीला संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे जागतिक मातृभाषा दिवस साजरा करण्यात येतो. जगभरात, भाषा हे एक साधन आहे जे लोकांना एकमेकांशी जोडते आणि त्यांची संस्कृती प्रतिबिंबित करते. देशात अनेक मातृभाषा असू शकतात. एकट्या भारतात अशा १२२ भाषा आहेत, ज्यात बोलणाऱ्यांची संख्या १० हजारांहून अधिक आहे. २९ भाषा अशा आहेत की ज्या १० लाख लोक बोलतात. बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये हिंदी, इंग्रजी, बंगाली, पंजाबी, अरबी, जपानी, रशियन, पोर्तुगीज, मंदारिन आणि स्पॅनिश यांचा समावेश होतो. जगातील भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अनेक मातृभाषांबद्दल जागरूकता आणण्याच्या उद्देशाने दरवर्षी २१ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन साजरा केला जातो.

### मातृभाषा दिनाचा इतिहास

१९९९ मध्ये UNESCO ने २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. बांगलादेशने प्रथमच हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. पुढे २००० सालापासून हा दिवस जगभरात साजरा केला जाऊ लागला.

### २१ फेब्रुवारी रोजी का साजरा करतात मातृभाषा दिवस

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानची निर्मिती झाली. पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान असे दोन भाग होते. पश्चिम बांगलादेशमध्ये उर्दू आणि पश्चिम बांगलादेशमध्ये बंगाली भाषिकांचे प्रमाण अधिक होते. तत्कालीन पाकिस्तान सरकारने भाषा धोरण लागू करून पाकिस्तानची अधिकृत भाषा म्हणून उर्दूला मान्यता दिली होती. पाकिस्तान सरकारच्या या धोरणाच्या विरोधात ढाका विद्यापीठात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. ढाका विद्यापीठातील आंदोलनावर पोलिसांनी २१ फेब्रुवारी १९५२ रोजी गोळीबार केला होता. आंदोलनाच्या परिणामी पाकिस्तान सरकारला नमतं घ्यावं लागले आणि बंगाली भाषेलाही मान्यता दिली.

## सॅमसंग इंडियाद्वारे आगामी एआय स्मार्टफोन प्री-रिझर्व्हवर खास ऑफर्स

**मुंबई : हॅलो प्रभात**

SAMSUNG

सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांचा आगामी एआय स्मार्टफोन प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांसाठी विशेष ऑफर्सची घोषणा केली. प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना २५६ जीबी ते ५१२ जीबीपर्यंत कॉम्प्लीमेण्टरी मेमरी अपग्रेड मिळेल. सॅमसंगचा आगामी एआय स्मार्टफोन सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथे २५ फेब्रुवारी रोजी गॅलेक्सी अनपॅकमध्ये लाँच करण्यात येईल. ग्राहक २५ फेब्रुवारीपर्यंत ९९९ रूपये रिफंडेबल टोकन रक्कम भरत नवीन गॅलेक्सी एस सिरीज डिवाईसेस प्री-रिझर्व्ह करू शकतात. स्टोरेज अपग्रेड व्यतिरिक्त प्री-रिझर्व्ह करणाऱ्या ग्राहकांना नवीन गॅलेक्सी एस सिरीज डिवाईसेसच्या खरेदीवर २६९९ रूपयांचे लाभ मिळतील. नवीन गॅलेक्सी एस सिरीज दैनंदिन परस्परसंवाद सोपे करण्यासाठी, आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि गॅलेक्सी एआयचा अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

## झी५ वर २७ फेब्रुवारी रोजी क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यमचा प्रीमियर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




या वर्षाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळाले. आता हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे. मराठी झी५ वर २७ फेब्रुवारी २०२६ रोजी या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित आणि क्षिती जोग व विराज गवस, उर्फी काझमी आणि अजिंक्य धमाल यांची निर्मिती केलेला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा संवेदनशील सामाजिक विषयावरील चित्रपट आहे. मराठी भाषा गौरव दिनी या चित्रपटाचा डिजिटल प्रीमियर होणार असल्यामुळे या प्रसंगाला अधिक अर्थ प्राप्त झाला आहे. सचिन खेडेकर, अमेय वाघ, प्राजक्ता कोळी, क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर अशा उत्तम कलाकारांची मांदियाळी असलेल्या या चित्रपटाने चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांच्या मनाला भावला.

## किया सेल्टोसने ६ लाख युनिट्स विक्रीचा टप्पा गाठला

**मुंबई : हॅलो प्रभात**



किया इंडिया या देशातील आघाडीच्या मास-प्रीमियम ऑटोमेकरने जाहीर केले की, सेल्टोसने २०१९ मध्ये लाँच झाल्यापासून भारतात एकूण ६ लाख युनिट्स विक्रीचा टप्पा पार केला आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामधून व्हेरिएण्ट्सप्रती ग्राहकांची, तसेच बाजारपेठांमध्ये शाश्वत स्वीकृती दिसून येते, ज्यासह हे मॉडेल मिड-एसयूव्ही श्रेणीमध्ये सर्वाधिक सातत्यपूर्ण परफॉर्मर ठरले आहे. सुरूवातीपासून सेल्टोसने स्पष्ट उत्पादन तत्त्वासह बाजारपेठेत प्रवेश केला. या वेईकलमध्ये विशिष्ट जागतिक डिझाइन, विविध पॉवरट्रेन पर्याय, तसेच पेट्रोल व डिझेल पर्याय, इंधन प्रकारांमध्ये ऑटोमॅटिक ट्रान्समिशन्स, मोठ्या स्वरूपातील इन्फोटेन्मेंट असलेली वैशिष्ट्य-संपन्न केबिन, कनेक्टेड कार तंत्रज्ञान आणि प्रीमियम इंटीरिअर फिनिशेसब आहेत. श्रेणीमध्ये मोठ्या प्रमाणात उपयुक्ततेला प्राधान्य दिले जात असताना सेल्टोसने केबिनमधील उत्सावहर्धक अनुभव, तंत्रज्ञान एकीकरण आणि व्हिज्युअल आकर्षकता यांवर मुख्यत्वे लक्ष केंद्रित केले.

## टाटा.इव्हीने लोकप्रिय पंच. इव्हीचे नवीन रूप सादर केले

**मुंबई : हॅलो प्रभात**




इव्हीला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलत, भारतातील शून्य उत्सर्जन वैयक्तिक मोबिलिटी सोल्यूशन्सचे अग्रगण्य प्रदाता टाटा.इव्ही ने आज आपल्या लोकप्रिय पंच.इव्ही चे नवीन रूप सादर केले, ज्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर इव्ही स्वीकारण्याची नवीन लाट सुरू झाली आहे. एंट्री लेव्हल इलेक्ट्रिक मोबिलिटीला लोकशाहीकृत करण्यासाठी डिझाइन केलेली, नवीन पंच.इव्ही ग्राहकांना त्यांच्या पहिल्या इलेक्ट्रिक कारमध्येच नव्हे तर त्यांच्या पहिल्या घरगुती कारमध्येही हवे असलेले सर्व काही एकत्र आणते. ही इव्ही मालकीला अडथळा आणणाऱ्या मुख्य अडचणी - परवडणारी किंमत, रेंजवरील विश्वास, चार्जिंगची सोय आणि बॅटरीची खात्री - पूर्णपणे दूर करते; ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर मुख्य प्रवाहातील इव्ही स्वीकारण्याचे संपूर्ण समीकरण सुटते. फक्त ९.६९ लाख रुपयांच्या (एक्स-शोरूम, मुंबई) आकर्षक प्रारंभिक किंमतीवर लॉन्च केलेली, नवीन पंच.इव्ही एंट्री-लेव्हल स्मॉल-कार सेगमेंटमध्ये आयसीई ऑफरिंगसोबत इव्ही मालकीला जवळजवळ ऑन-रोड किंमतीच्या बरोबरीवर आणते.

# सुवर्णा संजय ठिगळे ; एक प्रयोगशील शिक्षिका

**दै. हॅलो प्रभात**

शिक्षणामध्येजीवनबदलण्याचीआणिएकचांगले जग निर्माण करण्याची शक्ती आहे. यावर विश्वास असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या मिरज तालुक्यातील कसबे डिग्रज येथील प्राथमिक शिक्षिका सुवर्णा संजय ठिगळे ठरवून शिक्षिका झाल्या. शिक्षिका म्हणून सेवेत असताना त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक प्रयोग केले. शाळांच्याबरोबर मुलेही मॉडर्न केली. गुणांच्या बरोबर गुणवत्तेला महत्व दिले. त्यांच्या सेवा निवृत्तीच्या निमित्ताने...

विद्यार्थी केंद्रित शिक्षणाचा ध्यास घेतला तरच शिक्षण अधिक आनंदायी होते याची जाण आणि भान असणाऱ्या आणि ज्यांनी विद्यार्थी दशेत असतानातच आपणही एक दिवस शिक्षकच व्हायचे असे ठरवले त्या शिक्षिका म्हणजे सौ.सुवर्णा संजय ठिगळे. आई वडिलांच्या घरात उद्योग व्यवसायाचे वातावरण असतानासुद्धा त्यांनी अध्यापनाच्या आव्हानात्मक जगात पाऊल ठेवत आपल्यासमोर तीन महत्वाची ध्येये डोळ्यासमोर ठेवली. ज्या शाळेत कार्यरत राहायचे त्या शाळेच्या परिसरातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. दुसरी बाब म्हणजे माझा साथीदार हा प्राध्यापकच असला पाहिजे आणि शेवटचा निकष म्हणजे मी लग्नासाठी हुंडा देणार नाही. त्या शिक्षिका झाल्या, हुंडा न देता प्रा.संजय ठिगळे यांच्याशी विवाहबद्ध झालेल्या आणि विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून कार्यरत राहिल्या.



सुवर्णा ठिगळे यांनी ३५ वर्षाच्या सेवेच्या काळात खानापूर तालुक्यातील येवलेवाडी,मिरज तालुक्यातील मिरज तालुक्यातील कवलापूर, दत्तनगर (कुपवाड), दुधगाव आणि कसबे डिग्रज या गावांतील शाळामध्ये सेवा केली या काळात क्षमता किंवा जात-धर्म इत्यादी भेदभावांचा विचार न करता कार्यरत राहून प्राथमिक शिक्षणाचा पाया बळकट करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण क्षेत्रात अनेक प्रयोग करणाऱ्या सुवर्णा ठिगळे यांनी तळागाळातील मुलं शिकली पाहिजेत ;अंधकारात खितपत पडलेल्या ग्रामीण भागातील पददलित व दिन दुबळ्या माणसांच्या वस्त्यांमधील नव्या पिढीला ज्ञानाची वाट सापडली पाहिजे,यासाठी प्रयत्नशील राहिल्या. एका तपाच्या शिक्षण सेवेच्या कालावधीत मिरज तालुक्यातील कवलापूर येथील दलित वस्तीत असणाऱ्या शाळा क्रमांक दोन मध्ये आपल्या प्रोत्साहनाने शिक्षणापासून वंचित राहिलेल्या जवळपास शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे.

स्व यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेत अग्रस्थान पटकावले. शब्दशोध स्पर्धेत त्यांनी यश संपादन केले. त्यांनी आपल्या सेवाकाळात तीन आंतरराष्ट्रीय परिषदांमधून आपले संशोधन निबंध सादर केले आहेत. दोन राष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्येही आपण सहभाग घेतला आहे. विशेष म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, त्याचबरोबर विश्व मराठी साहित्य संमेलनात सहभागी झाल्या. विविध नियतकालिके, वृत्तपत्रातून विविध विषयांवर त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

शिक्षण प्रेमी, निसर्गप्रेमी आणि पक्षीप्रेमी असणाऱ्या सुवर्णा ठिगळे यांनी पक्षांच्यासाठी आपल्या बंगल्यात धान्यांची रांगोळी,पक्षांसाठी पाण्याची भांडी ठेवणे असे अनेक प्रयोग केले असून त्या टेरेस गार्डनच्या माध्यमातून सेंद्रिय पद्धतीने फळे, फुले आणि भाजीपाल्याचे उत्पादन घेतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने हिरकणी अवार्ड, सावित्रीची लेक आदर्श शिक्षिका पुरस्कार, एक्सलंट टीचर अवॉर्ड, अस्तित्व फाउंडेशनचा आदर्श शिक्षक पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. गेल्या ३४ वर्षाच्या काळात तळागाळातील मुलांना घडवण्यात महत्वाचे योगदान दिले. सेवानिवृत्तीनंतरच्या जीवन प्रवासास मनःपूर्वक शुभेच्छा!

• वासंती कोदांडे-खेराडकर

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **सांगली कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली - ४१६४१६
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : 9011889001 / 9021651976

# आत्मा मालिक गुरुकुलाच्या विद्यार्थ्यांचा राज्यस्तरीय गुणगौरव

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



सांगली येथील शांतीनिकेतन लोकविद्यापीठ परिसरात भरलेल्या शासकीय ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आणि उद्योग व सार्वजनिक बांधकाम मंत्री इंद्रनील नाईक यांच्या उपस्थितीत कला प्रदर्शनाचे उद्घाटन झाले असून यावेळी राज्यभरातील गुणवंत बालकलाकारांचा तसेच कला महाविद्यालयातील कलावंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

राज्यात नव्या बदलांसह संपन्न झालेल्या शासकीय बाल चित्रकला स्पर्धेत तब्बल १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यातून चौथ्या गटात प्रथम क्रमांक पटकावणारा आत्मा मालिक माध्यमिक गुरुकुलाचा विद्यार्थी अभिमन्यू मारणे याला सन्मानपत्र व १५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान कला संचालनालयाचे संचालक किशोर इंगळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सप्टेंबर महिन्यात झालेल्या इंटरमिजिएट रेखाकला परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीत पहिल्या शंभर विद्यार्थ्यांमध्ये राज्यात द्वितीय क्रमांक मिळवणारी साक्षी गायकवाड हिला शासकीय गुणवत्ता प्रशस्तीपत्र व ५ हजार रुपये पारितोषिक कलाशिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या सोहळ्यास विद्यार्थ्यांचे पालक, मित्रपरिवार तसेच राज्यातील विविध कला महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि कला क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी सांगितले, राज्यस्तरीय कला स्पर्धा व शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीत एका शाळेचे सर्वाधिक विद्यार्थी स्थान प्राप्त करण्याच्या यशामुळे आत्मा मालिक माध्यमिक गुरुकुलाचा गौरव वाढला आहे. राज्यस्तरीय कला प्रदर्शनात मिळवलेल्या या सन्मानामुळे आत्मा मालिक गुरुकुलाने कला क्षेत्रातील आपली गुणवत्ता पुन्हा अधोरेखित केली आहे.

**या यशामागे आत्मा मालिक माध्यमिक गुरुकुलाचे प्राचार्य निरंजन डांगे तसेच सर्व विभाग प्रमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन तर कलाशिक्षक मंगेश रहाणे, अविनाश चौधरी, सुमित मोरे, प्रसाद करडे यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश भट, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे सर यांच्यासह सर्व विश्वस्तांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.**

# एफआरपी न देणाऱ्या साखर कारखानदारांना इशारा!

**पुणे : हॅलो प्रभात**

- शेतकऱ्यांना 15 टक्के व्याजासह पैसे देण्याचा साखर आयुक्त यांचा आदेश
- पुढील सुनावणी 10 मार्च रोजी

यंदाच्या 2025-26 च्या हंगामात शेतकऱ्यांना उशिराने दिलेल्या उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीवर (एफआरपी) 15 टक्के व्याज साखर कारखान्यांना द्यावेच लागेल, असा इशारा साखर आयुक्त डॉ. संजय कोलतो यांनी सुनावणीदरम्यान दिलेला आहे, तर करारानुसार शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम दिली जात असल्याचेही काही कारखान्यांनी सुनावणीत स्पष्ट केल्याचे सांगण्यात आले. राज्यातील ज्या 45 साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एफआरपीची 60 टक्क्यांपेक्षा कमी रक्कम दिलेली आहे, अशा कारखान्यांच्या सुनावण्या साखर आयुक्तालयात दिनांक झाल्या. त्या वेळी साखर आयुक्तांनी ही भूमिका स्पष्ट केली. सुनावण्या पूर्ण झाल्यानंतर भेट घेतली असता साखर आयुक्त डॉ. कोलतो म्हणाले की, आयुक्तालयाने थकीत एफआरपीप्रश्नी कारखान्यांची बाजू मांडण्यासाठीच्या नोटिसा बजावताच काही कारखान्यांनी रक्कम दिल्याचे स्पष्ट केले आहे. 45 पैकी बहुतांश कारखान्यानी एफआरपीची रक्कम देण्याबाबत ऊस उत्पादकांसमवेत करार केलेले आहेत.

त्या वेळी करारानुसार जरी रक्कम देण्यास उशीर झाला असला, तरी विलंबित कालावधीसाठी कारखान्यांना व्याज द्यावे लागेल, असे सांगितले आहे. काही कारखान्यांनी थकीत एफआरपीची 31 जानेवारी 2026 अखेरची रक्कम आम्ही फेबुवारी महिनाअखेर देऊ, असे सुनावणीत स्पष्ट केले आहे. त्यावर संबंधित कारखान्यांची पुढील सुनावणी दिनांक 10 व 11 मार्च रोजी ठेवली आहे. तसेच, एफआरपीची रक्कम देताच तसा अहवालही आयुक्तालयास सादर करण्याच्या सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### सत्तेत जाण्याचा निर्णय वरिष्ठांशी बोलूनच : पालकमंत्री शंभूराज देसाई

**सातारा : हॅलो प्रभात**



सातारा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सत्ता सूत्राचा गुंता संपलेला नाही .भारतीय जनता पार्टीने आपली राजकीय रणनीती गतिमान केली असून सातारा जिल्ह्यात त्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यावर देण्यात आली आहे .या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाने आपल्या जिल्हा परिषदसदस्यांची मनोगते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातली असून सत्तेवर जाण्याचा कोणताही निर्णय हा वरिष्ठांशी बोलूनच घेतला जाईल असे स्पष्टीकरण पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पत्रकारांशी बोलताना दिले. येथील शासकीय विश्रामगृहामध्ये शंभूराज देसाई यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी बोलताना ते म्हणाले जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये सत्ता स्थापनेचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मला नाही मी इतका मोठा नाही जे निर्णय होतील ते वरिष्ठांशी बोलूनच होतील .शंभूराज देसाई पुढे म्हणाले जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत शिवसेनेने ताकतीने चांगल्या जागा निवडून आणल्या .त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली तरी झेडपी ज्यांना पुढील पाच वर्षे उत्तम काम करायचे आहे आणि नागरिकांच्या हिताला प्राधान्य द्यायचे आहे त्यांच्यासोबत जाण्याची आमची स्पष्ट इच्छा आहे .याबाबतचा सर्व राजकीय अहवाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आलेला आहे आमच्या 15 जागा निवडून आले असून मतदारांनी आमच्यावर दाखविला विश्वास आम्ही नक्कीच सार्थ ठरवू सत्तेत सहभागी होताना तांत्रिक बाबींमध्ये शिवसेना पक्षाने मला व्हीपचा अधिकार दिला आहे . शिवजयंतीच्या निमित्ताने साताऱ्यात गांधी मैदानावरून चालताना एका बाजूला शिवसेना राजे भोसले व दुसऱ्या बाजूला जयकुमार गोरे चालत होते आणि मला मधोमध चालण्यास सांगितल्यावर खरंतर मला भीती वाटत होती अशी कोपरखळी देसाई यांनी भाजपच्या दोन्ही नेत्यांना मारली.



### शिरूरमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**शिरूर : हॅलो प्रभात**

छ.शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाणीचे जादूगार प.पू.गुरुदेव श्री रमणीक मुनीजी म.सा.यांच्या ४७ व्या दीक्षा दिनानिमित्त आणि शिरूर भूषण दानशूर व्यक्तिमत्त्व भामाशाह रसिकलालजी धारीवाल यांच्या जयंतीनिमित्त व कापड बाजार गणेश मित्र मंडळ यांच्या ९९ वर्षानिमित्त कापड बाजार गणेश मित्र मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात १३१ जणांनी रक्तदान केले. कापड बाजार मित्र मंडळाच्यावतीने घेण्यात आलेले रक्तदान शिबीर व राबवण्यात येत असलेले सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचे यावेळी नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे म्हणाल्या. शिबीरास शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक नितीन पाचर्णे,नगरसेवक सागर नरवडे,नगरसेवक निलेश पवार, हिमानीश्री महाराज साहब,संघपती भरत चोरडिया,सुनील धाडीवाल,उद्योजक संदीप बिहाणी,धिरज संघवी,मयूर ओस्तवाल,श्रेयांस धाडीवाल आदींनी भेट दिली. शिरूर नगरपरिषद मंगलकार्यालयासमोर जैन पंचायत भवन येथे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीरात सहभागी प्रत्येक रक्तदात्यास इस्त्री व सन्मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.शिरुर येथील ओम रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभले.कापड बाजार मित्र मंडळाचे प्रितेश कोठारी व पंकज कोठारी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात शिवजयंती साजरी

**नातेपुते : हॅलो प्रभात**



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते येथे १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून १८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने "पदयात्रा" काढण्यात आली.महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.बी.टी.निकम यांनी शुभेच्छा दिल्या. पदयात्रे मध्ये महाविद्यालयचे विद्यार्थी,स्वयंसेवक,राष्ट्रीय सेवा योजना,कार्यक्रम अधिकारी,प्रा. जगदीशचंद्र मुळीक,प्रा.उत्तम सावंत,तसेच प्रा.श्रीकांत पवार,प्रा. नितीन देशपांडे,प्रा.राजेंद्र साठे,प्रा. सौ.पुष्पा सस्ते उपस्थित होते.आज १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.एम.बी. सावंत( निवृत्त प्राध्यापक इतिहास विभाग)उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण केले,ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते असे विचार त्यांनी मांडले. विद्यार्थी मनोगतामध्ये कु.साक्षी झेंडे व कु.जयश्री येडगे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.बाळासाहेब निकम यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. जिजाऊ वंदना प्रा.सौ.पुष्पा सस्ते यांनी गायली.कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.उत्तम सावंत यांनी केले,सूत्रसंचालन प्रा.सौ.पुष्पा सस्ते तर आभार प्रदर्शन प्रा.श्रीकांत पवार यांनी केले. तसेच ग्रंथालय,व एन.एस.एस. विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर ऑनलाइन प्रश्नावली सोडवून घेण्यात आली. वरील कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाधिकारी प्रा.जे.डी मुळीक,प्रा.उत्तम सावंत,ग्रंथपाल प्रा.दिलीप शिंदे यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी,राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.


# कुर्डूवाडीत अतिक्रमणे हटविण्याची मागणी; आंदोलनाचा इशारा

**कुर्डूवाडी : हॅलो प्रभात**

कुर्डूवाडी नगरपरिषदेच्या हद्दीतील वाढत्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीची कोंडी होत असून त्वरित कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस आय शहर कमिटीचे सचिव निलेश गवळी यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुर्डूवाडी शहरात प्रवासी व वारकऱ्यांची मोठी वर्दळ असते. अलीकडेच शहरातील मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्यात आले आहे. दोन वाहने सहज जाऊ शकतील एवढा रस्ता करण्यात आला असला तरी हातगाडीवाले, फळ व मांस विक्रेते यांनी रस्त्यावरच व्यवसाय मांडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यातच मोकाट जनावरांमुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. शहरातील अतिक्रमण व मोकाट जनावरांच्या प्रश्नाबाबत विविध संस्था व संघटनांनी यापूर्वीही लेखी व तोंडी निवेदने दिली होती, मात्र नगरपरिषदेकडून ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाने तातडीने अतिक्रमण हटवून कारवाई करावी, अन्यथा काँग्रेस आय पक्षाच्या वतीने उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

# जयसिंगपूरात लक्षचंडी यागाचा दुसरा दिवस उत्साहात

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**



- ३,६३३ भक्तांचा सहभाग, रविवारी प्राणप्रतिष्ठापना सोहळा

जयसिंगपूर येथील श्री स्वामी समर्थ दरबार मंदिर येथे पश्चिम महाराष्ट्रातील प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या लक्षचंडी (चंडी) यागाच्या दुसऱ्या दिवशी १५१ हवनकुंडांवर याग विधी भक्तिभावात संपन्न झाला. या धार्मिक विधीत ३ हजार ६३३ स्वामीभक्तांनी सहभाग नोंदवला. शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी तिसरे व अंतिम हवन संपन्न होणार असून, रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी श्री अन्नपूर्णा देवी, श्री लक्ष्मीनारायण व राधाकृष्ण मूर्तींचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा पार पडणार असल्याची माहिती मंदिर व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या चंडी यागात कुलदेवीची उपासना, दुर्गा सप्तशतीचे पठण व दररोज दहा हजार आवृत्तींचे हवन मोठ्या भक्तिभावात धार्मिक वातावरणात सुरू आहे. या कार्यक्रमासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यांसह कर्नाटक सीमाभागातून हजारो स्वामीभक्त भाविकांनी उपस्थिती दर्शवली आहे. रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यासाठी करवीर पीठाचे जगद्गुरु श्रीमद शंकराचार्य महाराज, स्वस्तिश्री जिनसेन भटारक पट्टाचार्य महास्वामीजी (नांदणी), जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज (संभाजीनगर), योगी निरंजनानाथ (आळंदी देवाची), प.पू. सद्गुरु गणा महाराज (अवतारी संत), डॉ. रविराज अहिरराव, श्रीमंत जन्मजेव राजे विजयसिंहराजे भोसले (अक्कलकोट), सद्गुरु स्वातीताई खाडये (कुडाळ) व डॉ. यश कश्यपयन आदी संत-महंत तसेच राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# शिवचरित्राचा जागर करा : डॉ. मिलिंद हुजरे

- छ. शिवाजी महाराज यांची जयंतीने शिवसप्ताहाची सांगता

**तासगाव : हॅलो प्रभात**



छत्रपती शिवाजी महाराज युगपुरुष होते.जुलमी राजवटीविरुद्ध लढा उभारून त्यांनी स्वराज्य निर्माण केले.

रयतेच्या राज्याची संकल्पना प्रत्यक्ष उतरवणारे लोककल्याणकारी राज्यकर्ते म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख आहे. विद्यार्थ्यांनी शिवविचार अंगिकृत करून शिवचरित्राचा जागर करावा असे उद्गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अर्थ सहसचिव प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना काढले.ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, स्वातंत्र्याची प्रेरणा संपूर्ण जगाला स्फूर्तीदायी आहे.शिवराय अखंडपणे अन्यायाविरुद्ध झुंजले. सर्व जाती ,धर्माचे मावळे एकत्र करून त्यांच्यामध्ये स्फुल्लिंग निर्माण केले.शिस्तबद्ध लष्कर ,उत्कृष्ट प्रशासन आणि गनिमी कावा या जोरावर सामर्थ्यशाली स्वराज्य निर्माण केले.शेतकऱ्यांच्या गवताच्या काडीचीही किंमत जाणणाऱ्या महाराजांनी शेतकऱ्यांसाठी नवनवीन योजना आखल्या त्यांना सर्व सोयी सुविधा दिल्या प्रसंगी शेतसारा माफ करुन त्यांना प्रोत्साहन दिले.विद्यार्थ्यांनी शिवछत्रपतींचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले.पुष्पांजलीच्या सोहळ्यात कु.प्रणाली गुरव हिने सादर केलेल्या शिवगर्जनेने समस्त महाविद्यालयाचे परिसर शिवमय झाले. तर कु. निर्जला पाटील हिने केलेल्या भाषणातून सर्व विद्यार्थ्यांना महाराजांचा इतिहास अभ्यासण्याची प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.जीवन घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शहाजी पाटील,एन.सी. सी. चे कॅप्टन डॉ.विनोदकुमार कुंभार, वार्षिक कार्यक्रम कमिटी प्रमुख डॉ. साईनाथ घोगरे तसेच ज्युनियर विभाग प्रमुख एस.आर.पाटील, डॉ. रणजीत कुंभार प्रा.एन.डी. नाईक, प्रा.रमेश मोटे,डॉ. अर्जुन वाघ,डॉ. धिरज भोसले, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, गुरुदेव कार्यकर्ते, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने पुष्पांजली व प्रतिमा पूजनाच्या सोहळ्यात सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. पल्लवी मिरजकर यांनी केले. आभार डॉ.आर.एस.कुंभार यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.तातोबा बदामे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छ. शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वात 'शिवगर्जना' ठरतेय मुख्य आकर्षण

## पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींची भरभरून दाद

**पिंपरी : हॅलो प्रभात**



'जय भवानी, जय शिवाजी', 'हर हर महादेव' च्या जयघोषात आणि स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या नेत्रदीपक दृश्यांनी निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसर अक्षरशः दुमदुमून गेला.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'विचार प्रबोधन पर्वा'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते या महानाट्याचा शुभारंभ करण्यात आला.याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,नगरसदस्य अमित गावडे,राजू मिसाळ,अभिषेक बारणे,चेतन भुजबळ,नगरसदस्या शैलजा मोरे,अर्चना कारंडे,माजी नगरसदस्य मारुती भापकर,अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे,उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जीवन बोराडे, सागर तापकीर,निलेश शिंदे,प्रकाश जाधव,संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, संतोष कवडे,श्रीमंत जगताप,नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोभे, सचिन आल्हाट,संदीप निकम, कुणाल कांबळे,सचिन बोऱ्हाडे,संदीप बोराडे,सागर लश्करे,स्वप्निल शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा.राष्ट्रपती महोदयांसमोर सादर झालेल्या या भव्य महानाट्यप्रयोगात सुमारे २५० हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदवला. महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माआधीचा सामाजिक व राजकीय कालखंड,बालपण, संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक भक्ती-शक्ती भेट,तोरणा विजय,स्वराज्य स्थापनेचा संघर्ष,शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र,प्रतापगड मोहीम,पन्हाळगड वेढा व सुटका,स्वराज्याच्या आरमाराची उभारणी,पुरंदरचा तह,आग्रा भेट,नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा विजय आणि भव्य शिवराज्याभिषेक सोहळा यांसारखे प्रसंग प्रभावीपणे सादर करण्यात आले. या सजीव सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना जागृत होत अनेकांनी उभे राहून या प्रसंगांना दाद दिली.

कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी सुयोग्य बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन,सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्या अधिपत्याखाली कायदा सुव्यवस्थेसाठी परिसरात २० सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

दरम्यान, 'शिवगर्जना' या महानाट्याचे आणखी दोन प्रयोग १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी याच ठिकाणी सायंकाळी ६.३० वाजता सादर करण्यात येणार असून नागरिकांनी या भव्य महानाट्यप्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**'शिवगर्जना' या महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, दूरदृष्टीची आणि सुशासनाच्या तत्त्वांची प्रभावी मांडणी नव्या पिढीसमोर होत आहे.इतिहास केवळ वाचण्याचा विषय नसून तो अनुभवण्याचा आहे,आणि अशा भव्य सादरीकरणातून युवकांना स्वराज्याच्या मूल्यांची प्रेरणा मिळणे ही काळाची गरज आहे. या महानाट्यामुळे नागरिकांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना अधिक दृढ होईल,असा विश्वास आहे.**

**- रवि लांडगे,महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## सांगलीत शासकीय योजना संवाद सत्राचे आयोजन

**सांगली : हॅलो प्रभात**

आत्मनिर्भर भारत, स्टार्टअप इंडिया, विकसित भारत या सारख्या अभियानाच्या उद्दिष्ट पूर्ती करण्यासाठी सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पालकमंत्री कार्यालय सांगली यांच्या द्वारे, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) व जिल्हा उद्योग केंद्र सांगली यांच्या सहयोगाने शासकीय योजना - संवाद सत्राचे आयोजन मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६, रोजी दुपारी ४ वाजता खरे मंगल कार्यालय विश्रामबाग सांगली येथे केले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सौ.विद्या कुलकर्णी, महाव्यवस्थापक - जिल्हा उद्योग केंद्र सांगली, शैलेंद्र जहागीरदार, जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), सांगली, माधव कुलकर्णी स्वावलंबी भारत अभियान, भूपाल सुल्ह्यान हे असणार आहेत. सांगली जिल्ह्यातील युवकांसाठी, बचत गटांच्या महिलांना अथवा शेतकरी यांच्यासाठी, स्वयंरोजगार, व्यवसाय कर्ज योजना माहिती आधारित शासकीय योजनांची माहिती, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना व इतर शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी मोफत असून नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क पालकमंत्री कार्यालय अथवा महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत ) सांगली ९११२२२८७६६ येथे फोन करून आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन कण्यात आले आहे.

## अमेरिकेबरोबरचा व्यापार करार दबावाखाली

**मुंबई : हॅलो प्रभात**

व्यापार करार हे आर्थिक प्रगतीचे साधन असतात, परंतु ते समान अटींवर आणि परस्पर लोकहिताच्या आधारावर असले पाहिजेत. देशाच्या सार्वभौमत्वाचा त्याग करून गुलामीकडे नेणारे करार कदापी स्वीकारार्ह नाहीत. व्यापार कराराच्या आडून देशहित आणि लोकहिताची आहुती देता येणार नाही. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार हा दबावाखाली केला असून तो भारतातील अन्नदात्यांचा गळा घोटणारा आहे, असा गंभीर आरोप करुन भारतातील १४४ कोटी जनता हे कधीही स्वीकारणार नाही, असा घणाघाती हल्ला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी केला आहे.

## भविष्यात सोशल मीडियासह ऑनलाइन व्यवहार ठप्प होणार : बापू महाराज वांयगणकर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

प्रचंड गतीने वाढत असलेला सोशल मीडिया भविष्यात केव्हाही ठप्प होऊ शकतो. यामुळे बँकिंग क्षेत्रापासून ते विमान प्रवासापर्यंतचे सर्व ऑनलाइन व्यवहार विस्कळीत होण्याची शक्यता आहे. या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी सर्वांनी आतापासूनच आपल्या गरजा मर्यादित ठेवून 'ग्रामीण केंद्रित' जीवनपद्धतीचा स्वीकार करावा, असे आवाहन पूजनीय बापू महाराज वांयगणकर यांनी केले आहे.

मुक्त सैनिक वसाहत परिसरातील सद्गुरु रेवन सिद्धनाथ मंदिरात महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर आयोजित आध्यात्मिक चिंतनात ते बोलत होते. यावेळी त्यांनी भविष्यातील संकटांबाबत अत्यंत गंभीर 'भाकणूक' वर्तवली.

पाण्यातून विषबाधा आणि लोकसंख्या घटण्याचा धोका

बापू महाराजांनी सांगितले की, आगामी काळात मानवजातीला कोरोनापेक्षाही भयंकर महामारीला



सामोरे जावे लागेल. पाण्यातून होणाऱ्या विषबाधेमुळे जगाची ३० ते ४० टक्के लोकसंख्या कमी होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. तसेच, समुद्रकिनाऱ्यावरील शहरांना सुनामीचा मोठा धोका असल्याचे सांगत त्यांनी सर्वांना पाणी उकळून पिण्याचे व आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचे आवाहन केले.

आर्थिक संकट आणि महागाईचा भडका

देशाच्या आर्थिक भविष्याबद्दल भाष्य करताना ते म्हणाले की, "भविष्यात सोन्याचे दर पाच कोटी रुपये, तर चांदी सहा लाख रुपयांपर्यंत पोहोचतील. इतकेच नाही तर पितळेलाही मोठे मोल येईल."भारत-पाक युद्ध आणि 'मिशन सिंधू'बापू महाराजांच्या भाकणुकीनुसार, सन २०२७ मध्ये भारत आणि पाकिस्तान दरम्यान मोठे युद्ध होईल. भारत 'मिशन सिंधू ३-४' यशस्वीरित्या पूर्ण करेल, मात्र या युद्धामुळे देशाला आणि सर्वसामान्य जनतेला प्रचंड मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल.

शेती आणि सत्संगाचा मार्ग या सर्व संकटांतून बाहेर पडण्यासाठी भारतीय विचार परंपराच तारून नेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.बळीराजाचे वैभवः भविष्यात शेती आणि शेतकऱ्याला पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त होईल.सात्विक जीवनः सर्वांनी सात्विक विचारांचा अवलंब करून, मर्यादित गरजांमध्ये विवेकी जीवन जगणे ही काळाची गरज आहे.आध्यात्मिक आधारः प्रताप कुंभार नगर येथील सद्गुरु रेवन सिद्धनाथ मंदिराच्या माध्यमातून सकारात्मक जीवनपद्धती आणि 'सोशल मीडिया विरहित' मुक्त संवादाचे उपक्रम राबवले जात असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

## बड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती दिमाखात



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बड्स इंटरनॅशनल स्कूल येथे १९ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवजयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थापिका मा. शोभा तावडे यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी इयत्ता १ली, ३री व ७वीच्या विद्यार्थ्यांनी शिवरायांवरील ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारत उपस्थितांची मने जिंकली. लहानग्यांच्या जोशपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या शौर्य, स्वाभिमान व आदर्शांचा अवलंब आपल्या जीवनात करावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चारशे वर्षांनंतरही शिवरायांचे विचार तितकेच ज्वलंत

### श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये शिवजयंती उत्साहात

**कोतोली : हॅलो प्रभात**

"जगात अनेक राजे झाले; पण गुलामाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारे आणि स्त्रियांना निर्भय स्वातंत्र्य बहाल करणारे एकमेव राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. म्हणूनच त्यांच्या जयंतीचे औचित्य चारशे वर्षांनंतरही तितकेच प्रेरणादायी आहे," असे प्रतिपादन कोल्हापूर येथील शाहू अध्यासनाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. जे. के. पवार यांनी केले.श्रीपतराव चौगुले आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते. "शिवराय हे केवळ राजे नव्हते, तर दूरदृष्टीचे प्रशासक व स्वराज्याचे शिल्पकार होते. जिजाऊंच्या संस्कारातून घडलेले



हे व्यक्तिमत्त्व आजही मार्गदर्शक आहे," असे ते म्हणाले. कार्यक्रमात शिवचरित्रावरील चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली.याच निमित्ताने कोतोली ते शेलारवाडी मार्गावर मेगा पदयात्रा काढण्यात आली. "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी परिसर दुमदुमला.कार्यक्रमास शिवाजीराव पाटील, डॉ. बी. एन. रावण, डॉ. एस. एस. कुरलीकर, डॉ. उषा पवार, डॉ. संपदा पिसे, सुरेश पाटील यांसह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. पी. डी. माने यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. डी. एच. नाईक यांनी केले.

## डॉ.जे.जे.मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त शहरातील क्रांती चौक ते महाविद्यालय या मार्गावर भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेत महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत विद्यार्थी व विद्यार्थिनी घोड्यांवर स्वार होऊन सहभागी झाले होते. पालखीमध्ये शिवराय विराजमान झाले होते. ठिकठिकाणी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून समाजप्रबोधनाचा प्रयत्न केला. शिवजयंतीनिमित्त युद्धकलांच्या प्रात्यक्षिकांचेही आयोजन करण्यात आले होते. या प्रात्यक्षिकांना नागरिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. महाविद्यालयात



शिवप्रतिमेचे पूजन संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यकारी संचालक डॉ. सुनील आडमुठे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डीन (स्टुडंट) प्रा. पी. पी. पाटील, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन एन. के. पुजारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

## विवेकानंद महोत्सवात कलागुणांचा जल्लोष ; स्पर्धांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे आयोजित विवेकानंद महोत्सवात विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक व बौद्धिक कलागुणांचा उत्स्फूर्त जल्लोष पाहायला मिळाला. विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत वातावरण दणाणून सोडले.

युगुल सादरीकरणात ऋषी डोंगरे व सृष्टी पाटील विवेकानंद कॉलेज प्रथम, अक्षय नलावडे-जहागिरदार (शिवाजी विद्यापीठ द्वितीय, तर शारदा शृंगारे व आर्या कुंभार डी.वाय.पाटील कॉलेज तृतीय ठरले. सोलो डान्समध्ये श्रीनंदन मालपाणी प्रथम, शुभम



कोळी (पी.डी.व्ही.पी.कॉलेज तासगाव व्दितीय, तेजश्री कुलकर्णी डी.वाय.पाटील कॉलेज तृतीय ठरल्या. ग्रुप डान्समध्ये देवयानी ग्रुप प्रथम, तनिष्का ग्रुप द्वितीय (दोन्ही विवेकानंद कॉलेज तर Shrimati A.R.P. कन्या कॉलेज इचलकरंजी तृतीय ठरले.

आयडियाथॉनमध्ये पंडित मोहिते व सहकाऱ्यांचा संघ प्रथम, पौर्णिमा धनवडे,द्वितीय, सुश्रुत देशमुख तृतीय ठरले. रिल फ्लिक्स स्पर्धेत अस्लम कलादर्गी, प्रथम, अभिषेक बनसोडे द्वितीय, मिथाली कांबळे तृतीय ठरले.'मिस्टर अँड मिस विवेकानंद' किताब श्रीशैल शिंदे व आर्या काटकर यांनी पटकावला.

सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील व निहाल रुकडीकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. कविता तिवडे यांनी मानले. नियोजनात डॉ. श्रुती जोशी, डॉ. सिद्धार्थ कट्टीमनी, प्रा. सनी काळे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महोत्सव यशस्वी ठरला.

## विद्यार्थ्यांनी शिवरायांप्रमाणे अष्टपैलू गुण आत्मसात करावेत : पृथ्वीराज ऐकले

**पेठ वडगाव : हॅलो प्रभात**

शूर,पराक्रमी, दूरदृष्टी असलेले, कुशल संघटक, प्रजाहितदक्ष, न्यायप्रिय, चारित्र्यसंपन्न, सहिष्णू व नैतिकतेने परिपूर्ण असे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज हे गुणसंपन्न होते. विद्यार्थ्यांनी शिवरायांप्रमाणे अष्टपैलू गुण आत्मसात करावेत, असे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते पृथ्वीराज ऐकले यांनी केले. ते आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, पेठ वडगाव येथे शिवजयंतीनिमित्त आयोजित




शिव चिंतन सोहळ्यात बोलत होते.स्वागत व प्रास्ताविक करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. एस. घुगरे म्हणाले की, शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी या शिव चिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवरायांनी अचाट जिद्द व प्रगल्भ बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक संकटे दूर करून स्वराज्याची स्थापना केली.यावेळी कृष्णाराव अर्जुन केळुसकर लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज' या चरित्रग्रंथाचे चिंतन करण्यात आले. या ग्रंथातील विविध प्रकरणांची माहिती शिक्षकांनी दिली.

कार्यक्रमास आदर्श शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. डी. एस. घुगरे,मुख्याध्यापिका सौ. एम. डी. घुगरे, ग्रीन व्हॅली पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक व्ही. एस. डोईजड, पर्यवेक्षक एस. जी. जाधव, प्रशासक एस. ए. पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्राचार्य एस. एस. चित्ते, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक एम. एस. चौगुले, प्रायमरी विभागाचे मुख्याध्यापक एस. एस. गिरीगोसावी, अधीक्षक ए. डी. झरेकर, जिमखाना प्रमुख नरेंद्र कुपेकर व एस. एस. मदने. आर. के. डोंबे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए. एन. इंगवले यांनी केले.

## विद्याताई मोठे यांचे जत शहरात जंगी स्वागत

**जत : हॅलो प्रभात**

काही दिवसापूर्वी जिल्हा परिषद निवडणूक संपन्न झाली आटपाडी तालुक्यातील निंबोडे गटातील जिल्हा परिषद लढतीकडे जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रात लक्षलागुन राहीले होते. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वहिनी सौ माधवीताई पडळकर यांच्या विरोधात शिवसेनेतून साध्य फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र राज्य ॲड विद्याताई मोठे हे निवडणूक रिंगणात उतरले होते. त्यांनी सौ माधवीताई पडळकर यांच्या विरोधात जोरदार लढत दिली. अल्पमताने पराभव झाला असता



तरी त्यांच्या पराभवाची चर्चा मात्र रंगली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सौ विद्याताई मोठे यांना जत येथे आमंत्रित करण्यात आले होते. सौ विद्याताई मोठे यांचे फटाक्याच्या आतषबाजीत जत शहरात जोरदार स्वागत करण्यात आले. शिवसेनेमार्फत सलीम भाई गंवडी यांनी त्यांचे स्वागत केले यावेळी पप्पू मोगली, तेजस्विनी व्हनमाने ,अशोक गरड, प्रवीण शेठ गडदे,आधी जण उपस्थित होते. तर छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळाच्या वतीने, साध्य फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड सौ विद्यायाताई मोठे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून मिरवणूक सुरू करण्यात आली.त्याचें जंगी स्वागत करण्यात आले.या वेळी विजय राजे चव्हाण, बाळ सावंत, सोनू सगरे,सतीष सुर्यवंशी,सोनु कणसे, ओंकार एडके, सुमित कोडग, प्रमोद चव्हाण,राम कोडग,ज्ञानु कोळी,विक्रम ढोणे यांच्या सह शिवप्रेमी उपस्थित होते. यावेळी बोलताना साध्य फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष विद्याताई मोठे म्हणाल्या की माझा जरी थोडक्या मताने पराभव झाला असता तरी लोकांची मी मने जिंकली असून.साध्य फाउंडेशनच्या माध्यमातून माझे सामाजिक कार्य सुरूच राहील. त्याचबरोबर जत तालुक्यातील जनतेने माझे जोरदार स्वागत केले आहे मी

**साध्य फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष ॲड विद्याताई मोठे यांचे जत शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त लावण्यात आलेले पोस्टर जत शहरात चर्चेचा विषय बनला आहे.**

भाराऊन गेले असून. साध्य फाउंडेशनच्या माध्यमातून माझे सामाजिक कार्य जत तालुक्यात या पुढे राहील.महिलाना साध्य फाऊंडेशनच्या माध्यमातून रोजगार देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगत येणारी पुढील माजी राजकीय दिशा ही ठरवेल की जत तालुक्यात लक्ष घालायचं की नाही हे येणाऱ्या काळात याचा आम्ही नक्की विचार करू असे विद्याताई मोठे म्हणाल्या.

## निकमवाडी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी मध्ये युवा कार्यकर्त्यांकडून शिवजयंती अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात साजरी



करण्यात आली. पहाटे पन्हाळा येथील शिव मंदिरातून ज्योत आणण्यात आली व छत्रपती शिवरायांच्या मूर्तीची विधिवत पूजा करून आकर्षक सजावट करण्यात आली. बालगोपाळनी आपल्या सायकलींना भगवे ध्वज लावून गावातून फेरी काढली. सर्व गाव भगवेमय झाले होते. सायंकाळी श्रींचा जन्मोत्सव साजरा होऊन छत्रपती शिवरायांची आरती करण्यात आली आणि सर्व उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. शिवछत्रपतींचा जयजयकार आणि घोषणांनी गावातील मुख्य चौक दुमदुमला.

## छ.शिवाजी महाराजांचे स्मरण आजही प्रेरणादायी : प्रतिकदादा पाटील

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

छ. शिवाजी महाराज यांचे शेती-शेतकरी, महिला आणि जाती - धर्माबद्दलचे विचार उदात्त होते. आपण सर्वांनी महाराजांचे हे विचार आत्मसात करून त्यांचे आचरण करणे ही काळाची गरज आहे,अशी भावना राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांनी राजारामनगर येथील समारंभात बोलताना व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराजां चे स्मरण आजही आपणा सर्वांना प्रेरणादायी असल्याचे उद्गारही त्यांनी काढले.राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. संचालक कार्तिक पाटील, विठ्ठल पाटील,राजकुमार कांबळे,रामराव पाटील, कार्यकारी संचालक



आर.डी.माहुली,सचिव डी. एम.पाटील,कामगार नेते राजेंद्र चव्हाण,कामगार संचालक विकास पवार,मनोहर सन्मुख प्रामुख्याने उपस्थित होते.प्रतिकदादा पाटील पुढे म्हणाले,छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्येही कधी हार मानली नाही. त्यांनी अशा परिस्थितीवर मोठया धैर्याने मात केली आहे. अफजल खानाचा वध,आग्र्याहून सुटका,पन्हाळगडाचा वेढा, पुण्याच्या लाल महालात तळ ठोकलेल्या शाहिस्तेखानावर केलेला हल्ला आदी घटना - प्रसंग आजही अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या महाराष्ट्र राज्यात जन्माला आले,हे आपले भाग्य आहे. आज महाराजांचे स्मरण करताना त्यांचे विचार समजून घेऊन ते अंमलात आणायला हवेत.प्रारंभी कार्यकारी संचालक आर.डी.माहुली यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तर सचिव डी.एम. पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी एस.डी.कोरडे,विजय मोरे,संदीप पाटील,सुनिल सावंत,प्रशांत पाटील,संतोष खटावकर,प्रेमनाथ कमलाकर,डॉ.प्रकाश म्हाळुंगकर,महेश पाटील, अनिलकुमार पाटील,धनाजी लाड,धैर्यशील पाटील,उमेश सुतार,जे.बी.पाटील,विश्वनाथ पाटसुते,मुकेश करळे,भूपाल पवार,आर.एस. पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात छ.शिवाजी महाराज जयंती उत्साहात

**सांगली : हॅलो प्रभात**

भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरी करण्यात आली.

यावेळी शिवप्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. ए. रणखांबे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य डॉ. अमित सुपले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात



आला.

यावेळी बोलताना डॉ. सुपले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून स्वाभिमान, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात उच्च मूल्ये जोपासावीत. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. हर्षल वांगीकर यांनी आपल्या मनोगतात शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी, कुशल प्रशासन व स्वराज्य स्थापनेच्या महान कार्याचा उल्लेख केला. त्यांनी शिवाजी महाराजांचे जीवन युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून त्यांच्या विचारांचे आचरण जीवनात करण्याचे आवाहन केले. वनस्पतींची जपणूक आणि पर्यावरणाचे महत्त्व महाराजांनी दाखवून दिले असून, स्वाभिमान, संघटनशक्ती आणि राष्ट्रनिष्ठा या मूल्यांची जपणूक करणे हेच महाराजांना खरे अभिवादन ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, विविध विभागांचे प्रमुख, वरिष्ठ, कनिष्ठ व व्यवसाय शिक्षण विभागातील सर्व प्राध्यापक, तासिका तत्त्वावरील प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि वातावरणात देशभक्तीची भावना संचारली. कार्यक्रमाचे संयोजन सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. वर्षा कुंभार यांनी केले, तर या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाने केले. सर्वांच्या सहभागामुळे कार्यक्रम शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला.



## थोडक्यात पण महत्वाचे



### झांबरे व नागरगोजे यांची पदोन्नती

**शेवगाव-अजय नजन : हॅलो प्रभात**

अहिल्यानगर नगर पोलीस दल अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेले पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे व बाळासाहेब नागरगोजे यांची पोलीस हेडकॉन्स्टेबल (पोलीस हवालदार) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही अधिकाऱ्यांनी कर्तव्यकठोरता, प्रामाणिक सेवा आणि शिस्तबद्ध कामकाजाच्या जोरावर ही बढती मिळवली आहे. स्थानिक गुन्हे शाखेत विविध गुन्ह्यांच्या तपासात सक्रिय सहभाग नोंदवत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी दोघांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. पदोन्नती ही अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारी असून भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करावी, असे त्यांनी नमूद केले. झांबरे व नागरगोजे यांच्या या यशाबद्दल मित्रपरिवार व नातेवाईकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### राहुरी बसस्थानकात वंचितकडून शिवरायांना अभिवादन

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी येथील बसस्थानक परिसरात वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.जिल्हा संपर्कप्रमुख पिंटू साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिवादन कार्यक्रम पार पडला. शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी पिंटू साळवे यांनी मार्गदर्शन करताना महाराजांनी अठरापगड समाजाला सोबत घेत स्वराज्याची स्थापना केली, असे सांगितले. तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांनी रायगडावर शिवरायांची समाधी शोधून पहिली शिवजयंती साजरी केल्याचा उल्लेख त्यांनी केला. या कार्यक्रमास पत्रकार आप्पासाहेब मकासरे, मनोज कळमकर, बाळासाहेब म्हस्के, अक्षय शिंदे, जगन्नाथ धोत्रे, गणेश शिरसाट, सुनील शेलार, नितीन कदम, हरुन सय्यद, राजू बागुल, दिपक चव्हाण, प्रकाश कर्डक, श्याम नन्नवरे, संदीप वैरागर आदी उपस्थित होते. बसस्थानकात स्थानक प्रमुख गोविंद गुलदगड व वाहतूक नियंत्रक बागुल यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी चालक, वाहक तसेच प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जीत अदाणी यांचे ‘सार्वभौमत्वा’कडे धोरणात्मक पाऊल

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात**

जीत अदाणी यांनी गुरुवारी नूतनीकरणक्षम ऊर्जेला कृत्रिम बुद्धिमत्ता सार्वभौमत्वाचा पाया असल्याचे सांगत अदाणी ग्रुप च्या १०० अब्ज डॉलर्सच्या एआय पायाभूत सुविधा उभारणीच्या वचनबद्धतेला हरित ऊर्जा आणि हायपरस्केल संगणन यांच्या एकत्रीकरणावर आधारित धोरणात्मक गुंतवणूक म्हणून मांडले. नवी दिल्ली येथे आयोजित एआय इम्पॅक्ट समिटमध्ये बोलताना अदाणी म्हणाले की एआय युगाची ओळख अल्गोरिदमपेक्षा अधिक विश्वसनीय, उच्च-घनतेची वीजपुरवठा व्यवस्था आणि विस्तारक्षम डेटा सेंटर क्षमतेच्या उपलब्धतेवर ठरेल. स्वच्छ ऊर्जा, मजबूत वीजजाळे आणि उच्च-कार्यक्षमता संगणन यांचे मोठ्या प्रमाणावर संयोजन साधणाऱ्या देशांना दीर्घकालीन स्पर्धात्मक लाभ मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

# मिरी पाणीटंचाईवर प्राजक्त तनपुरे आक्रमक



## वेळप्रसंगी प्रसाद शुगरच्या माध्यमातून मदत करू

**तनपुरे यांनी मिरी-तिसगाव नळयोजनेचे अध्यक्ष एकनाथ आटकर यांच्याशी संपर्क साधून, प्रादेशिक योजनेतून तात्पुरता पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत चर्चा केली. राजकारणाच्या पलीकडे जाऊन आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. प्रसंगी मनुष्यबळ किंवा यंत्रसामग्रीची गरज भासल्यास प्रसाद शुगर कारखान्याच्या माध्यमातून मदत केली जाईल, असे आश्वासनही तनपुरे यांनी यावेळी दिले. टँकरसाठी सहकार्य करणारे रणारे ज्येष्ठ नेते राजूमामा तागड, जगदीश सोलाट, एकनाथ झाडे व पवार यांचे तनपुरे यांनी आभार मानले. तसेच मिरी येथील दिवंगत संतोष सावंत यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले व त्यांच्या मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली.**

**राहुरी : हॅलो प्रभात**

पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे तनपुरे यांनी ग्रामस्थ व कार्यकर्त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पाणीपुरवठ्याबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी संबंधित विभागाचे अधिकारी जायभाय, कनिष्ठ अभियंता घुगे, तसेच ठेकेदार मुरदारे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत योजनेची सविस्तर माहिती घेतली. कामातील दिरंगाईबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. येत्या आठ दिवसांत नवीन योजनेच्या माध्यमातून मिरीला सुरळीत पाणीपुरवठा सुरू न झाल्यास प्रशासनाच्या हलगर्जी कारभाराविरोधात आणि दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी मिरीत तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशारा तनपुरे यांनी यावेळी दिला. येथे मागील सुमारे महिनाभरापासून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भेडसावत आहे. यावेळी माणिकराव गवळी, भागिनाथ गवळी, बंडूआबा झाडे, नंदराज कुटे पाटील, राजूभाई शेख, जगदीश सोलाट, बापूराव झाडे, बद्रिनाथ सोलाट, मच्छिंद्र दारकुंडे, अरुण झाडे, श्रीराम गवळी, हरी दाणे, गोरख झाडे, महेंद्र सोलाट, मयूर तागड, वसंत वाघमारे, अमोल मिरपगार, अरुण वाबळे यांच्यासह ग्रामस्थ व महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राजक्त तनपुरे यांनी मागील काही दिवसांपासून मोफत टँकर उपलब्ध करून दिला होता. त्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

## जनार्दन स्वामी विद्यालयात शिवजयंती साजरी



**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी येथील श्री संत जनार्दन स्वामी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, कोल्हेवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उल्लेखनीय सहभाग नोंदवला.

यावेळी छात्र भारती विद्यार्थी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले यांनी आपल्या भाषणात शिवरायांचे स्वराज्य, स्वावलंबन व राष्ट्रनिर्मितीचे तत्त्व स्पष्ट केले. तसेच महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या कार्याचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक वेशभूषा सादर करून आपले विचार व्यक्त केले. सांस्कृतिक कार्यक्रमातही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. ‘राजमुद्रा’ सादरीकरण हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले असून अध्यक्षांनी सर्वांचे कौतुक व अभिनंदन केले.

## मुळानगर-विद्यापीठ रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी तालुक्यातील मुळानगर ते महात्मा फुले कृषि विद्यापीठ दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामावर निकृष्ट दर्जाचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडून कामाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



ग्रामस्थांचा आरोप

खडकवाडी, मुळानगर व विद्यापीठ परिसरातील ग्रामस्थांसाठी महत्त्वाच्या असलेल्या या १,८०० मीटर लांबीच्या रस्त्यासाठी सुमारे ५१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. डांबरीकरण, मजबुतीकरण व साइड पट्ट्यांचे काम यामध्ये अपेक्षित आहे. स्व. शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रयत्नांतून हा रस्ता मंजूर झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले होते. मात्र ठेकेदाराकडून अत्यल्प डांबर व खडी वापरून काम केल्याचा आरोप होत आहे. साइड पट्ट्यांसाठी रस्त्यालगतचा मुरूम उकरून वापरला जात असल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याबाबत बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रार करूनही सुधारणा होत नसल्याने वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या मागणीनुसार मंजूर झालेले हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अक्षय कर्डिले यांनाही याबाबत माहिती देण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## मुळा डाव्या उजव्या कालव्याचे २३ फेब्रुवारीपासून आवर्तन

### मंत्री विखे पाटील यांचा निर्णय

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

मुळा लाभक्षेत्रातील मुळा उजवा व डाव्या कालव्या वरील शेतकऱ्यांची पाण्याची मागणी लक्षात घेवून रब्बी हंगाम 2 साठी २३ फेब्रुवारी २०२६ पासून आवर्तन सुरू करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकार्याना दिल्या आहेत. सद्य परिस्थितीत उन्हाची तीव्रता वाढल्याने लाभक्षेत्रात पाण्याची पातळी खूपच खालावल्याने शेतकऱ्यांच्या पाणी सोडण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होती. यासंदर्भात आ. मोनिकाताई राजळे, आ.विठ्ठलराव लंघे यांनी जलसंपदा मंत्री विखे पाटील साहेब यांची भेट घेवून रब्बी पिकांची तसेच पिण्याच्या पाण्याची आवश्यकता लक्षात घेवून आवर्तन सोडण्याची विनंती केली होती. मंत्री विखे पाटील यांनी धरणातील पाण्याचा उपलब्ध साठा तसेच भविष्यातील पाण्याचे नियोजन विचारात घेवून आवर्तनाचा कालावधी निश्चित करण्याचे अधिकार्यांना सांगितले.



सदर आवर्तनाचा उजवा कालव्या वरील राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी या तालुक्यातील लाभक्षेत्रातील शेतकर्यांना फायदा होणार असून, सदर आवर्तन ४५ दिवसाचे असेल, त्याच्यासाठी धरणातील ५ टीएमसी इतका पाणीसाठा राखीव आहे. या या आवर्तनाचा लाभ अंदाजित २७हजार हेक्टर क्षेत्राला होईल.

मुळा डाव्या कालव्यासाठी ४५० एमसीएफटी इतका पाणीसाठा असून आवर्तन २१ दिवस चालणार आहे. त्याचा फायदा अंदाजीत २५००हेक्टर इतके क्षेत्राला होईल.आवर्तनाच्या कालावधीत पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या तसेच शेवटच्या शेतकर्याला पाणी मिळेल असे नियोजन अधिकार्यांनी करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले आहेत.

## आर के मरीन करिअर अकॅडमीत जुलै बॅचचा शुभारंभ

**कराड : हॅलो प्रभात**

कराड येथील नामांकित आर के मरीन करिअर अकॅडमी मध्ये जुलै २०२६ बॅचच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून शिवजयंतीदिनी नव्या बॅचचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. बी.टेक मरीन इंजिनिअरिंग (४ वर्षे), बी.एस्सी. नॉटिकल सायन्स (३ वर्षे) तसेच जी.पी. रेटिंग (६ महिने) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज अकादमीच्या राजनक्षत्र, कार्वे नाका, कल्याणी शाळेजवळील कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती संचालक राहुल कुमार खडके यांनी दिली. अकादमीच्या १५ व्या वर्धापनदिनानिमित्त आणि शिवजयंतीचे औचित्य साधून बॅचचा शुभारंभ राहुल कुमार खडके यांचे वडील निवृत्त नायब तहसीलदार विठ्ठलराव खडके यांच्या हस्ते करण्यात आला. अकादमीची स्थापना १५ वर्षांपूर्वी वडूज येथे झाली असून २०११ पासून कराड येथे मुख्य शाखा कार्यरत आहे. गेल्या १५ वर्षांत अकादमीच्या मार्गदर्शनाखाली २००० हून अधिक कॅडेट्स विविध देशांत शिपिंग क्षेत्रात यशस्वीरीत्या कार्यरत आहेत.

# ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी १५ मार्चचे उद्दिष्ट

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेने येत्या १५ मार्च २०२६ पर्यंतचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी शहरातील सर्व अंगणवाडी सेविकांनी कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान यांची नुकतीच भेट घेऊन शहरातील लाडक्या बहिणींची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. शासनाने ठरवून दिलेल्या तारखेपूर्वी सर्व लाभार्थींनी अंगणवाडी सेविकांना भेटून कागदपत्रांची पूर्तता करावी व ठरलेल्या वेळेत आपली ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी,असे आवाहन कोपरगाव नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



### अंगणवाडी सेविकांची नगराध्यक्ष पराग संधान यांच्याशी चर्चा

यावेळी कोपरगाव शहरातील अंगणवाडी सेविकांनी कोपरगाव नगरपालिका प्रशासनाशी विविध विषयांवर चर्चा करून शासकीय उपक्रमांसाठी आवश्यक ती मदत करण्याचे निश्चित केले आहे. यामुळे शहरातील केवायसीपासून वंचित राहिलेल्या समस्त लाडक्या बहिणींच्या अडचणी दूर होऊन त्यांची ई-केवायसी पूर्ण होण्यास मोठी मदत होणार आहे.या कालावधीत कोपरगाव शहरातील लाडक्या बहिण योजनेची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी प्रशासन व नगरपालिकेला आवश्यक ते सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

महायुती सरकारच्या माध्यमातून २०२४ मध्ये राज्यातील महिलांच्या सशक्तीकरणासाठी लाडकी बहीण योजना राबविण्यात आली. गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळावे, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यावर दरमहा १,५०० रुपये शासनाच्या वतीने थेट जमा केले जातात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कोपरगावच्या मा. आ.स्नेहलता कोल्हे आणि विवेक कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव शहरातील लाडक्या बहिणींना विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.कोल्हे परिवाराच्या वतीने शहरातील महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून नुकत्याच झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. अनेक महिला नगरसेवक म्हणून निवडून आल्या असून त्या विविध समित्यांमध्ये सभापती म्हणून देखील कार्यरत आहेत.

याप्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान, गटनेते प्रसाद आढाव,विनोद राक्षे,कैलास मंजुळ, संदीप देवकर, फिरोज पठाण आदी उपस्थित होते.


## राहुरी नगरपरिषद राहुरी जि. अहिल्यानगर

### ई- निविदा सुचना/बी-१ निविदा सुचना

मा. मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद क्षेत्रातील सन 2026-27 या आर्थिक वर्षात करावयाच्या खालील 1 ते 3 कामांची वार्षिक ई-निविदा पद्धतीने PWD / MJP / योग्य त्या वर्गात नोंदणीकृत व अनुभवी संस्था / मक्तेदार तसेच ई.पी.एफ परवाना धारक यांचेकडुन निविदा मागविणेत येत आहे. सदर 1 ते 3 कामांची ई निविदा शासनाच्या https\\ mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर दि. 21/02/2026 पासुन दि. 02/03/2026 पर्यंत पहावयास मिळेल. तसेच कामांच्या निविदा बाबतची शुद्धीपत्रके, वेळापत्रकातील बदल सदर वेब पोर्टलवर प्रसिद्ध करणेत येईल. अ.क्र. 4 च्या ऑफलाईन कामाची बी-1 निविदा नमुने विक्री दि. 21/02/2026 पासुन दि. 02/03/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत रोख किंमतीम विकत मिळतील, मोहरबंद निविदा दि. 04/03/2026 रोजी सायं. 05.00 वा. पर्यंत स्विकारल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फि 18% G.S.T सह | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1. | राहुरी नगरपरिषद हद्दीमध्ये बांधकाम विभागाकडील किरकोळ कामे करणे. (सर्व शासकीय करासह) (ई-निविदा) | 25,000/- | 2,000/- | सन 2026-27 व पुढील कार्यादिश होईपर्यंत |
| 2. | राहुरी नगरपरिषद बांधकाम विभागा करीता साहित्य पुरवठा करणे. (सर्व शासकीय करासह) (ई-निविदा) | 15,000/- | 1,500/- | |
| 3. | राहुरी नगरपरिषद बांधकाम विभागाकरीता ढापे पुरवठा करणे. (सर्व शासकीय करासह) (ई-निविदा) | 5,000/- | 1,000/- | |
| 4. | राहुरी नगरपरिषद हद्दीतील रस्ते पॅच वर्क करणे. (ऑफलाईन B-1 निविदा) | 3,000/- | 500/- | |

सही/-
(अभिजित हराळे)
मुख्याधिकारी

सही/-
(श्री. गजानन सातभाई)
उपाध्यक्ष
राहुरी नगरपरिषद राहुरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर

सही/-
(श्री. भाऊसाहेब मोरे)
नगराध्यक्ष

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५००० /- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७००० /- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १०००० /- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976